# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE

REACHING NATIONS

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXV | JANUARY 2024 | No. 12


## पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

यिर्मया ३१ : २३-२८

२३) सेनाधीश परमेश्वर, इस्त्राएलाचा देव असे म्हणतो की मी यहूदा देशाचा व त्यांतील नगरांचा बंदिवास उलटवीन तेव्हां या देशांत लोक पुन: हे आशीर्वचन म्हणतील: हे धार्मिकतेच्या निवासा, पावित्र्याच्या गिरी, परमेश्वर तुझें कल्याण करो!

२४) यहूदा व त्यांतील सर्व नगरे यांतलें लोक शेतकरी व मेंढरांचे कळप घेऊन फिरणारे असे त्यांत एकत्र राहतील.

२५) कारण श्रात जिवास मी तृप्त केले आहे, प्रत्येक म्लान हृदयास पुन: भरुन काढिलें आहे.

२६) यानंतर मी जागा होऊन पाहतों तो ही माझी निद्रा मला गोड अशी भासली.

२७) परमेश्वर म्हणतो, पाहा, असे दिवस येत आहेत की त्यांत मी इस्त्राएलाच्या घराण्यांत व यहूदाच्या घराण्यांत मनुष्यबीज व पशुबीज पेरीन.

२८) आणि असे होईल की उपटण्याच्या व मोडून टाकण्याच्या पाडून टाकण्याच्या व नाश करण्याच्या आणि पीडा करण्याच्या कामी मी जशी त्यांवर नजर ठेविली तशी बांधून काढण्याच्या व लागवड करण्याच्या कामी मी त्यांजवर नजर ठेवीन असे परमेश्वर म्हणतो.

# तू माझ्या उत्तम वरदानांनी तृप्त होशील!

## असे परमेश्वर म्हणतो (यिर्मया ३१:१४)

**YOU SHALL BE SATISFIED WITH MY GOODNESS!**
**says the Lord - Jeremiah 31:14.**

**देव या संदेशाद्वारे जी त्याची लेकरें २०२४ मध्ये त्यांच्या जीवनात काय घडणार हे समजण्यास उत्सुक आहेत. त्यांना कळविल!**

**मानद् प्रमुख संपादक, रेव्हा. ॲन्जेलीन सेल्वाकुमारी**



आमच्या **एको ऑफ हिज कॉल** कुटुंबाच्या सर्व सभासदांना हे नूतन वर्ष सुखाचे आणि आशीर्वादाचे जावे!

आमच्या **एको ऑफ हिज कॉल** सेवा कार्याला देत असलेल्या सततच्या पाठींब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याकरीता त्याच्या कृपेने आणखीन एक वर्ष देवून आशीर्वादीत केले आहे. तुमच्या आग्रही प्रार्थना आणि स्वेच्छा दानांमुळे आम्हाला जगभरात हजारो लोकांपर्यंत पोहचणे शक्य होत आहे. तुमच्या पाठींब्याबद्दल आम्ही सदैव ऋणी आहोत. सर्व जगाला आशेचा आणि शुभवर्तमान संदेश गाजविण्याकरीता तुम्ही तुमच्यां खर्च करीत असलेल्या वेळाबद्दल आणि अश्रु ढाळीत करीत असलेल्या प्रार्थनांबद्दल, देव निच्छितच केवळ तुम्हालाच नाही तुमच्या पुढील पिढ्यांना देखील आशीर्वाद देणार. हे त्याच्या लोकांना त्याने दिलेले अभिवचन आहे हातात हात

(...पान ३ वर)



**एको ऑफ हिज कॉल** पाच मिनिटांचा संदेश

### यू ट्युब ख्रिश्चन चॅनल

### पास्टर सॅम सेल्वा राज

**यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी**

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

Every day – From 2.00 A.M.

प्रतिदिनी - पहाटे पाच वाजता रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

REACHING NATIONS



# तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



**आमचे कार्याविषयीचे धोरण**

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


**HON. EDITOR-IN-CHIEF**
Rev. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.

**MANAGING EDITOR**
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

**GENERAL MANAGER**
Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM., MBA.

**ADMINISTRATION**
Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)

**EDITORIAL BOARD**
Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Sis. L. Mariya Anjalin, M.A., M.Sc., B.Ed.
Rev. Dr. K.R. Rajasekaran



**EDITOR, PUBLISHER & PRINTER**
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers



10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858 95661 31858

**E.MAIL**
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

**WEBSITES**
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

**YOUTUBE CHANNEL**
Echo of His Call


## "तूं आपल्या प्रसादानें वर्ष भूषित करितोय..."

(स्तोत्र - ६५:११

प्रभुमधील अति प्रिय बंधुनो आणि बहिणींनो!

हे संपादकीय लिहिण्यास देवाने दिलेल्या संधी बद्दल मी त्याचा ऋणी आहे. माझे वडील पास्टर सॅम सेल्वाराज, हे सेवाकार्यातील जबाबदारी आणि प्रवास करण्यात अतिशय व्यस्त असल्यामुळे त्यांनी मला हे काम सोपविले आहे. तुमच्या आमच्या सोबतच्या अनेक दशकांच्या भागीदारीबद्दल आणि तुमच्या प्रेमाबद्दल मी आभार व्यक्त करितो.



पाळक ॲलेक्स सॅमसन सॅम

डिसेंबर २०२३च्या मागील महिन्यात देवाने आम्हाला कधीहि संपर्कात न आलेल्या अशा असंख्य लोकांना भेटण्याची संधी देवून आशीर्वादीत केले. आमच्या नूतन वर्षाच्या उपासना देखील देवाच्या आशीर्वादाने भरलेल्या अशा होत्या. आमची खात्री आहे की २०२४ हे वर्ष तुमच्या करिता आणि तुमच्या कुटुंबाकरिता अधिक फलदायी आणि आशीर्वादीत होईल.

आम्ही नित्यनियमाने तुम्हांकरिता प्रार्थना करितो आणि आमच्या **एको ऑफ हीज कॉल यूट्युब** चॅनलच्या माध्यमातून इंग्रजी, तामिळ, हिन्दी आणि तेलगू भाषांमध्ये पहाटेचे मननपर संदेश प्रसारीत करीत आहोत. आणि इतर भाषांमध्ये देखील प्रसारण वाढविण्याची आमची उत्कट इच्छा आहे. **एको ऑफ हीज कॉल** चे सेवा कार्य अधिक भरभराटीचे जावे यासाठी प्रार्थना करण्याची विनंती करीत आहोत.

**एको ऑफ हीज कॉल** सेवा कार्यकरिता तुमच्या प्रार्थना आणि आधाराची अपेक्षाकरित आहोत. या संदर्भात तुम्हाला आठवण करुन देऊ इच्छित आहोत कि कॉलेजमध्ये तामिळ



नहेम्या बायबल कॉलेजचे पुढारी

आणि हिन्दी भाषेत वर्ग घेतले जात आहेत. या नवीन वर्षात आम्ही इंग्रजी भाषा समाविष्ट करण्याचे योजीत आहोत. आम्ही प्रशंसनीय अशी अधीकृत संस्था-**एशिया थियॉलॉजीकल असोशीएशन** कडून अधीकृत मान्यता प्राप्त करण्याच्या शेवटच्या टप्प्यात आहोत, हे जाहिर करण्यास आम्हांस अत्यंत आनंद होत आहे. आम्हाला त्यांच्याकडून अधीकृत नोंदणी

सभासदत्व प्राप्त झाले आहे. आमचे सर्व सहकारी जे अतिशय प्रभाविपणे **नहेम्या बायबल कॉलेज** चालवित आहेत; आणि ते पुढील पातळीवर नेण्याकरीता मदत करीत आहेत. त्यांच्याकरिता कृपया प्रार्थना करीत राहा.

कृपया आमच्या सर्व कार्याकरिता, प्रामुख्याने **एको ऑफ हीज कॉल** सेवा कार्य, १६ भाषेंत प्रसिद्ध होणारे मासिक, बहुभाषिक मंडळ्या, **बायबलकोर टपालाद्वारे शास्त्राभ्यास, टपालाद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम, सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल,** सुवार्ता साहित्य छापणारे मुद्रणालय आणि संबंधीत सेवा कार्याकरीता प्रार्थना करीत राहा.

**''परमेश्वर तुला आशीर्वाद देवो व तुझे संरक्षण करो; परमेश्वर आपला मुखप्रकाश तुजवर पाडो व तुजवर कृपाकरो; परमेश्वर तुजकडे प्रसन्नमुख करो आणि तुला शांति देवो''**. (गणना ६:२४-२६).

**ख्रिस्त येशूमधील तुमचे दास,**

**पास्टर ॲलेक्स सॅमसन सॅम**
**पास्टर एस्. सॅम सेल्व राज**

(+91) 98412 71858 / 98410 71858,
E.mail : sam@echoofhiscall.org

(पान १ वरुन...)

घालून हे महान असे कार्य पुढे सुरु ठेवू या!

माझी प्रार्थना आहे, की या वर्षी देवाने तुम्हाला या जगाला देवाच्या चातुर्याने, सुज्ञतेने, उत्तम शरीर स्वास्थ्याने, ताकदिने आणि मन:शांतिने मार्ग दाखविण्याकरीता शहाणपण द्यावे आणि याहिपेक्षा अधिक त्याने तुम्हाला त्याच्या वरदानांनी तृप्त करावे.

बायबल यिर्मया ३१:१४ या वचनात म्हणते... **''माझे लोक माझ्या उत्तम पदार्थांनी तृप्त होतील''.**

या वर्षाच्या सुरुवातीसच विश्वास ठेवण्यास हे अभिवचन किती सुंदर आहे. माझे लोक माझ्या उत्तम *वरदानांनी तृप्त होतील.* याचा अर्थ मी असमाधानी, अभाव असलेला किंवा अतृप्त असणार नाही. या वर्षात देव माझ्या सर्व गरजा पुरविल. हे वर्ष देवाचे चांगुलपण अनुभवण्याचे आणि तो पुरविल त्यांत तृप्त असण्याचे असणार. **''...डोळ्याने पाहिले नाही, कानाने ऐकलें नाही, व माणसाच्या मनांत आले नाही, तेंआपणावर प्रीति करणाऱ्यांसाठी देवानें सिद्ध केले आहे''.** (१ करिंथ २:९). अशा प्रकारे देव या नूतन वर्षात आपल्याला चालविणार आहे. तुम्ही उत्तेजीत नाही कां झालात? मी उत्तेजीत झाले आहे. कारण तो (देव) त्याच्या अभिवचना संबंधात विश्वसनिय आहे.

## देवाचे चांगुलपण!

देव, जो आपला स्वर्गीय पिता, त्यांने आपल्याला अगोदरच अनेक चांगल्या गोष्टि देवून आशीर्वादीत केले आहे. तथापी सैतान अतिशय चलाखीने मनात गोंधळ निर्माणकरुन सभोवतालच्या आशीर्वादांकडे दुर्लक्ष करण्यास भाग पाडतो.

एदेन बागेतील उदाहरण तपासून पाहूया. उत्पत्ति १:२६-२८, ३१ या वचनात देवाने आदाम आणि हवा यांना आशीर्वाद दिला आणि म्हटले :-

**''मग देव बोलला, आपल्या प्रतिरुपाचा व आपल्याशी सदृश असा मानव आपण करु,... देवानें त्यास आशीर्वाद दिला, देव त्यांस म्हणाला, फलद्रुप व्हा, बहुगुणित व्हा, पृथ्वी व्यापून टाका व ती सत्तेत आणा, समुद्रांतील मत्स्य, आकाशांतील पक्षी व पृथ्वीवर संचार करणारे सर्व प्राणिमात्र यांवर सत्ता करा.''** आपण निर्माण केलेले सर्वबहुत चांगले आहे असे देवानें पाहिले.

उत्पत्ति २:१७ मध्ये आज्ञा दिली, **''पण बऱ्यावाईटाचें ज्ञान करुन देणाऱ्या झाडाचे फळ खाऊ नको; कारण ज्या दिवशी त्याचे फळ तूं खाशील त्या दिवशी तूं खास मरशील.''**

आपण सर्वगोष्टींवर वर्चस्व करु असे देवाने जाहिर केले, परंतु आजच्या या जगात अनेकदा असे वाटते कि आपले फोन आणि आधुनिक तंत्रज्ञान यासहित आपल्या सभोवताली असणाऱ्या सर्व गोष्टिंचे आपल्यावर वर्चस्व आहे.

सैतानानें देवाचे वचन कसे फिरविले हे लक्षात घ्या: **''...तुम्ही खरोखर मरणार नाही. देवाला हे ठाऊक आहे की तुम्ही त्याचे फळ खाल त्याच दिवशी तुमचे डोळे उघडतील आणि तुम्हांस बरेवाईट कळू लागून तुम्ही देवासमान व्हाल.''** (उत्पत्ति ३:४-५)

येथे आपणास सैतानाने शब्दात केलेली हेराफेरी (लबाडीने केलेला बदल) ज्या द्वारे आदाम आणि हवा यांना ते मरणार नाहित, उलट देवासारखे बनतील अशी भूरळ घालताना पाहावयास मिळतो. सैतान देऊ करत असलेले देव देवू शकतो. त्यापेक्षा अधीक मोठे आणि सामर्थ्यशाली आहे दर्शवीत आहे. हि यूक्ती ओळखीची कां बरे वाटत आहे? कारण सैतान आज देखील लोकांना देवापासून आणि त्याच्या मार्गापासून दूर करण्यासाठी हेच सूत्र वापरीत आहे. जगीक गोष्टि आपला प्रभु येशू देवू इच्छितो त्यापेक्षा अधिक दर्जेदार, मोठ्या आणि सामर्थ्यशाली आहेत असे दर्शविते.

सरते शेवटि; आदम आणि हवा यांनी त्या दुष्टाचे ऐकले, त्यांच्या जीवनातील अति महत्वाचे ही गमावले.

**''तेव्हा त्या उभयतांचे डोळे उघडले- परंतु त्यांनी त्यांची शांति आणि आनंद गमावला व ते बागेतील झाडांच्याआड लपली.''** (उत्पत्ति ३:७-१०).

**''...देवाने त्यास एदेन बागेतून ज्या भूमींतून त्यास निर्माण केले होते, तिची लगवड करावी म्हणून बाहेर काढिले.''** (उत्पत्ति ३:२३).

**तुझ्यामुळे भूमीला शाप आला आहे. तूं जन्मभर कष्ट करुन तिचा उपज खाशील; ती तुला कांटे व कुसळें देईल; तू शेतातले पीक खाशील; तूं आपल्या निढळाच्या घामानें भाकर मिळवून खाशील.''** (उत्पत्ति ३:१७-१९).

ते देवाचे वरदान गमावून बसले!!! देवा बरोबरच्या सहवासाचा आनंद.

**आनंद हा देवाच्या वरदानाचा पुरावा आहे** - (प्रे.कृ. १४:१७)

त्याने त्याचे दयाळूत्व (वरदान) त्यांच्या ऋतुत आकाशातून पर्जन्य आणि पिक देवून दाखविल. तो तुम्हाला भरपूर मुबलक आनंद देऊन तुमचे अंत:करण आनंदाने भरुन टाकीतो.

आपल्यापैकी अनेकजण आनंद आणि सुख यांत गोंधळ घालतात. तेव्हा मी दोघांतील फरक शोधण्यासाठी संशोधन केले :-

- आनंद हा छोटा शब्द आहे. सुख-समाधान हा मोठा शब्द आहे.
- आनंद अंत:करणांत (हृदयात) असतो. सुख-समाधान चेहऱ्यावर असते.
- आनंद हा आत्म्याचा आहे. सुख-समाधान क्षणिक आहे.
- आनंद वरचढ होतो. सुख-समाधान प्रतिक्रीया देतो.
- आनंद शांति आणि समाधान स्विकारण्यात आले वाट पहात असतो.
- आनंद खोलवर जाऊन तेव्हा तो; तर सुखसमाधानात स्विकारुन चिटकून रहातो.
- आनंद एक प्रकारे सराव आणि स्वभाववृत्ति आहे तो स्वभाविक आणि हेतुपुरस्कर असतो. सुखसमाधान त्याच्या मार्गाने येत जाते.
- आनंद हा गहन-अनाकलनीय आणि आत्मिक असतो. ''चिंता करु नको, आनंद कर''. सुखसमाधान एक उपशामक औषध आहे. ''चिंता करु नको, समाधानी रहा.''
- आनंद हि आंतरिक भावना आहे. सुखसमाधान बाह्य अविर्भाव आहे.
- आनंद दु:ख, कष्ट आणि परिक्षा सहन करतो आणि त्याच्या अर्थाशी आणि कारणांशी जुळतो.

मनुष्य सुखसमाधानाचा पाठलाग करतो. परंतु आनंदाची निवड करितो.

शांति आणि आनंद बहुतेक एकत्र असतात. जेथे शांति असते तेथे आनंद असतो, आणि आनंद असतो, तेथे शांति असते. त्या जणू जुळ्या बहिणीप्रमाणे आहेत. आनंद हा देवाच्या वरदानापैकी एक आहे आणि आपले अंत:करण त्याने भरुन आपल्याला त्याद्वारे तृप्त करण्याचे अभिवचन दिले आहे.

नहेम्या ८:१० या वचनात, ''**परमेश्वराविषयींचा जो आनंद तोच तुमचा आश्रयदुर्ग होय.**'' असे म्हटल्याप्रमाणे.

तथापी सैतानाने हवेशी केले, त्याचप्रमाणे देवाच्या चांगुलपणाच्या निर्बंधाचा विपर्यास करण्याचा प्रयत्न करितो. देवाने आपल्या जे दिलेले आहे, अपेक्षा अधिक प्राप्त करण्याच्या मोहात पाडून पुढील परिणामाकडे नेतो :-

## १) असमाधान/असंतुष्टता!

देवाने त्यांना जे अभिवचन दिले होते, त्यांत हवा संतुष्ट नव्हती. असंतुष्टता किंवा असमाधानी वृत्ती हि देवाच्या चांगुलपणाच्या विरोधातील पहिला शत्रु. ''मजकडे ते असते तर'' किंवा ''मला आणखीन हवे आहे'', जेव्हा आपण असे बोलताना आढळतो, तेंव्हा देवाने जे दिले त्याचे मोल वाटत नाहि आणि समाधानी न होतो परंतु जर आपण समाधान व्यक्त केले तर आनंद अनुभवता येईल.

रोम १५:१३ हे वचन आपल्याला आठवण करुन देते कि, ''आता आशेचा देव तुम्हांस विश्वास धरण्यात सर्वथै व हर्षभरित व शांतिपूर्ण करो, असे कीं तुम्हांला पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने विपुल आशा प्राप्त व्हावी.

असमाधान/असंतुष्टता आपला आनंद हिरावून घेते. देवानें दिलेल्या अभिवचनाच्या विरुद्ध आहे. त्याऐवजी देवाच्या चांगुलपणावर/वरदानांवर संतुष्ट/समाधानी रहाण्यास शिकले पाहिजे. देवाने आपल्याला जे काहि दिले त्यात खुष रहावयास आणि या वर्षाच्या सुरुवातीस समाधानाचा आणि कृतज्ञतेचा आत्मा जीवनात रोपण करण्यास शिकूया.

## २) निराशा :-

सैतान आपला आनंद हिरावून घेण्याकरिता ''निराशा'' निर्माण करितो. अपेक्षा असते तेथे निराशा येणे अटळ आहे.

(...पान ६ वर)


# नहेम्याह बाइबल कॉलेज
## रेसिडेन्शल कॉलेज, चेन्नई।

माध्यम: हिन्दी

ECHO OF HIS CALL 1968-2018 REACHING NATIONS

ATA Regd. Candidate for Membership NEHEMIAH BIBLE COLLEGE CHENNAI ECHO OF HIS CALL Estd. 1968

*सदस्यता के लिए पंजीकृत उम्मीदवार* - ATA

**सुविख्यात अंतर्राष्ट्रीय मसीही अगुवे तथा पिछले 54 वर्षो से सेवारत वरिष्ठ पासवान**

**Certificate in Ministry**

**Diploma in Theology**

**योग्यता 10 वी या अधिक**

**जल्दी करें!**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

★ ऑनलाइन कक्षाएं उपलब्ध हैं ★

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES
SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ जानेवारी ते १८ फेब्रुवारी २०२४ पर्यंत

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## ✝ स्तुति करिता मुद्दे

**१९ जानेवारी** : आपल्याला आपल्या मुख्य आणि शाखा मंडळ्यांत ख्रिसमस आणि नूतन वर्षाचे कार्यक्रम अर्थभरीत आणि परिणामकारक रित्या पार पाडता आल्याबद्दल.

**२० जानेवारी** : आपल्या प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार, महान आज्ञापाळनातील भागीदार व त्यांच्या कुटुंबावर असलेल्या देवाच्या दयेबद्दल.

**२१ जानेवारी** : मुख्य मंडळीतील आणि शाखा मंडळ्यांतील पाळकांना आणि वरिष्ठ पुढाऱ्यांना आशीर्वाद दिल्याबद्दल.

**२२ जानेवारी** : आपली Global Vision for Youth and Kid Care Ministry आशीर्वादित केल्या बद्दल.

**२३ जानेवारी** : शुभवर्तमान न पोहचलेल्या सर्वांपर्यंत ते पांच मिनिटांच्या संदेशा द्वारे यूट्यूब चॅनल माध्यमातून पोहचविण्याची सेवा आशीर्वादित करीत असल्या बद्दल.

**२४ जानेवारी** : **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल, नहेम्या बायबल कॉलेज** आणि **पत्रव्यवहाराद्वारे** करण्यात येत असलेल्या अभ्यासक्रमाबद्दल.

**२५ जानेवारी** : आपल्या मुद्रणालयात १६ भाषांत छापून ते प्रसिद्ध करुन सर्व मिशन क्षेत्रांत पाठविण्यात येत असलेली मासिक सेवा आशीर्वादित करीत असल्याबद्दल.

**२६ जानेवारी** : मागील महिन्यातील आपल्या आर्थिक आणि आत्मिक गरजा पुरविल्याबद्दल.

**२७ जानेवारी** : मिशन क्षेत्रातील सेवकांना आणि कुटुंबियांना आशीर्वादित केल्याबद्दल.

**२८ जानेवारी** : आपल्या बहुविविध सेवांद्वारे आपल्या वरिष्ठ पाळकांना सुवार्ता गाजविण्याच्या समर्पितपणाबद्दल.

**२९ जानेवारी** : आपल्या एको ऑफ हिज कॉलच्या सर्व स्टाफ आणि त्यांच्या कुटुंबियांना आशीर्वादीत केल्याबद्दल.

**३० जानेवारी** : तरुणांना मंडळीच्या सर्व कार्यक्रमात उत्साहाने सहभागी होण्यास आशीर्वादीत केल्याबद्दल.

**३१ जानेवारी** : आपले वरिष्ठ पाळक पास्टर एस्. सॅम सेल्वाराज व कुटुंबियांचे दुष्ट शक्तिंपासून सुरक्षित ठेविल्याबद्दल.

**०१ फेब्रुवारी** : प्रार्थनांचे आणि आर्थिक पाठबळ देवून आशीर्वादित केल्याबद्दल.

**०२ फेब्रुवारी** : आपल्या सर्व सहसंपादकांना कुटुंबासहित आशीर्वाद दिल्याबद्दल.

**०३ फेब्रुवारी** : आपल्या मुख्य मंडळीतील आणि शाखा मंडळ्यांतील रविवारच्या उपासनामधील देवाच्या सामर्थ्यशाली वचनाबद्दल.

## ✝ प्रार्थने करीता मुद्दे

**०४ फेब्रुवारी** : सर्व ख्रिस्ती संस्था आणि मंडळ्यावर देवाचा आशीर्वाद असावा आणि त्यांच्या सुरक्षिततेकरिता.

**०५ फेब्रुवारी** : कार्यालयीन आणि मुद्रणालयातील कर्मचाऱ्यांच्या उत्तम प्रकृति स्वास्थ्यासाठी.

**०६ फेब्रुवारी** : आपल्या निवासी आणि सायंकालीन नहेम्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षतेसाठी.

**०७ फेब्रुवारी** : पास्टर एस्. सॅम सेल्वाराज यांच्या **एको ऑफ हीज कॉल यूट्युब चॅनल** संदेशातील अधीक भाषांत वाढ व्हावी.

**०८ फेब्रुवारी** : **नहेम्या बायबल कॉलेज**च्या अभ्यासक्रम शिकविण्यात आणि भाषांतर करण्यातील सर्व सहकर्मीसाठी.

**०९ फेब्रुवारी** : इस्राएल, पॅलेस्ताइन आणि रशिया, युक्रेन यांच्यात शांतता प्रस्थापित व्हावी.

**१० फेब्रुवारी** : KOHA या संगणकप्रणालीत **नहेम्या बायबल कॉलेज**च्या लायब्ररीमधील पुस्तके अद्यावत केली जातील.

**११ फेब्रुवारी** : आपले वरिष्ठ पाळक एस्. सॅम सेल्वाराज व त्यांच्या कुटुंबियांचे दुष्ट शक्तिंपासून रक्षण व्हावे.

**१२ फेब्रुवारी** : जागतिक आर्थिक मंदिची स्थिती संपुष्टात यावी.

**१३ फेब्रुवारी** : मिशनऱ्यांच्या आणि देवाच्या सेवकांच्या विरोधातील हिंसामय कृति थांबल्या जात्यात.

**१४ फेब्रुवारी** : जगभरातील सर्व स्त्रियांच्या आणि लेकरांच्या सुरक्षिततेसाठी.

**१५ फेब्रुवारी** : वरिष्ठ पाळकांना त्यांचे आत्मचरित्र लिहिण्यात यश मिळावे.

**१६ फेब्रुवारी** : **एको ऑफ हीज कॉल**च्या तरुणांमधील आणि बाह्य सेवा कार्यासाठी.

**१७ फेब्रुवारी** : या वर्षातील **एको ऑफ हीज कॉल**च्या सेवा कार्याकरिता आवश्यक निधी उपलब्ध व्हावा.


**१८ फेब्रुवारी** : जगातील सर्व देशातून करोना आणि इतर संसर्गजन्य आजारांचे निर्मुलन व्हावे.

(पान ४ वरुन)

देवाने आपल्याला प्रार्थनेत आपण जसे मागितले अगदी तसेच द्यावे अशी अपेक्षा असते. आपली इच्छा पूर्ण झाली नाहि तर आपण निराश आणि नाऊमेद होतो. जीवनातील समस्या आणि आवाहाने यांना सामोरे जावे लागते ती आपल्याला खाली खेचतात कि त्यामुळे आपल्याला निराश वाटते. उदाहरणार्थे - आपण कदाचित एक नोकरी मिळावी किंवा बढती मिळावी अशी इच्छा करीत असतो, आणि ती मिळते तेव्हा असे लक्षात येते कि ती आवाहने आणि तणावासहित आहे. कामाचा व्याप कदाचित पूर्णपणे सहनशक्तिच्या पलीकडचा असतो आणि त्यात तुम्ही अगोदर अपेक्षा केल्याप्रमाणे नसतो; जसे ''...मला वाटले ''असे असेल'' किंवा ''असे असते तर बरे झाले असते.''

अडचणींयुक्त परिस्थिती आपल्याला अपेक्षाभंगाकडे नेऊ शकते, परिणामी त्याविरोधात नकळत दु:ख आणि तक्रार करण्यास प्रवृत्त करु शकते. अशा प्रक्रियेत आपण आपला आनंद आणि शांति गभावून बसतो, आणि माझ्या मित्रांनो देव हे कदापी सहन करु शकत नाही.

इस्राएल लोकांनी मिसर देश सोडला तेव्हा त्यांचा याचा अनुभव आला. ४३० वर्षे देवाकडे आक्रोश केल्यानंतर **''त्यांनी रात्रंदिवस चालावे म्हणून परमेश्वर त्यास दिवसा मेघस्तंभ व रात्री अग्निस्तंभाच्या**



*मेघस्तंभ आणि अग्निस्तंभ*

**ठायी त्यांच्यापुढे चालत असे.''** (निर्गम १३:२१). ते अतिशय आनंदित झाले आणि संपूर्ण पंधरावा अध्याय त्याच्या नामाची स्तुति करण्यास समर्पित केला. त्यांनी नाचून, गाऊन आनंद व्यक्त केला.

लक्षात ठेवा, तुम्ही जस जसे देवाच्या



*कुरकुर करु लागले*

जवळ येता, सैतान तुमच्या मार्गात आवाहाने आणि मार्गात वळणे आणेल. इस्राएल लोकांना तीन दिवस पिण्यास पाणी मिळाले नाहि तेव्हा त्यांना त्या आवाहानाला सामोरे जावे लागले. (निर्गम १५:२२) आणि ते तक्रार करु लागले. देवाने त्यांना त्याच्या दास्यातून, शापातून, बंधनातून सोडविले व स्वतंत्रता दिली या त्याच्या चांगुलपणा ते विसरले. दुर्देवाने असे आहे आपली स्मरणशक्ति कमी असल्यामुळे आपल्याला देवाचा चांगुलपणा लक्षात रहात नाहि.

**ते कुरकुर करु लागले.** (निर्गम १५:२४) देवाचे चांगूलपणा विसरुन



*सत्तर तळवे असलेल्या बारा विहिरी*

आपण किती वेळा तक्रार केली? त्यांना तीन दिवस प्यावयास पाणी मिळाले नाही आणि अपेक्षापूर्ण झाल्या नाहित, त्यांच्यात निराशा आली. निराशा आपला आनंद आणि शांति हिरावून घेते.

आपल्या विचांरापेक्षा देवाचे मार्ग उच्च आणि महान असतात. त्यांनी तक्रार केली, कुरकुर केली तरी देखील देवाने त्यांच्या साठी केवळ **एक नाही तर बारा झरे तयार केले.** (निर्गम १५:२७). एका वंशाकरिता एक असे मला वाटते. देवाला अगोदरच दिसले कि ते तक्रार करतील आणि ते

(...पान ८ वर)


## नहेम्या बाईबल निवासी कॉलेज

**वेलाचेरी आणि चेपॉक संतोषपुरम**

माध्यम : तमिळ

**अभ्यासक्रम डिप्लोमा इन थियॉलॉजी/सर्टिफिकेट अभ्यासक्रम (ATA)**

**आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ठ पाळकांद्वारे ५४ वर्षांपासून मान्यता प्राप्त**

**ईश्वरविद्या सर्टीफिकेट**

**ईश्वरविद्या डिप्लोमा**

**शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक**

प्रवेशा करिता त्वरा करा !

**संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज**

१०, महंम्मद अब्दुल्ला २री गल्ली, क्रिकेट स्टेडियम समोर, चेपोक, चेन्नाई-६००००५, भारत

फोन : (०४४) २८५२ ८२८२, मोबाईल : ९८४१० ७१८५२, ९५६६१ ३१८५८

E-mail: sam@echoofhiscall.org Websites : www.echoofhiscall.org

## कृपया आमच्या मुख्यालयातील सेवाकार्याकरिता प्रार्थना करा

| | | |
|---|---|---|
| १. | प्रार्थना सेवा | : २४ तास |
| २. | बायबलकोर | : पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम : इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी |
| ३. | एको ऑफ हिज कॉल | : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन |
| ४. | नहेम्या बायबल कॉलेज (दोन केंद्र) (सायंकालीन / निवासी) | |
| ५. | पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ | |
| ६. | महान आजापालनाचे भागीदार (पाळकांचे नेटवर्क) | |
| ७. | प्रशिक्षण कार्यक्रम | |
| ८. | महासभा | |
| ९. | छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा | |
| १०. | शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : | प्रकाशने |
| ११. | सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल | : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल |
| १२. | शब्बाथ शाळा | : सकाळी ८.३० आणि सायंकाळी ४ वाजता - रविवारी |
| **१३.** | **तामिळ उपासना** | **: सकाळी ८.०० आणि १०,०० वाजता - रविवारी** |
| **१४.** | **हिन्दी उपासना** | **: सायंकाळी ४ वाजता - रविवारी** |
| **१५.** | **तेलगु उपासना** | **: सायंकाळी ५ वाजता - रविवारी** |
| **१६.** | **इंग्रजी आणि तामिळ उपासना** | **: सायंकाळी ६ वाजता - रविवारी** |
| १७. | स्त्रियांची प्रार्थना | : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी |
| १८. | पुरुषांची प्रार्थना | : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी |
| १९. | शिष्यत्त्वाची सभा | : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी |
| २०. | गृह प्रार्थना सभा | : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी |
| २१. | विशेष प्रभु भोजन | : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी |
| २२. | सेवाकाची समालोचन सभा | : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार |
| २३. | पालकांची प्रार्थना | : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार |
| २४. | रात्रभर प्रार्थना | : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शुक्रवार |
| २५. | उपास प्रार्थना | : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शनिवार |
| २६. | पवित्र सहभागिता | : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत |
| २७. | सकाळचे मनन | : पहाटे ५ वाजता - दररोज |
| २८. | कार्यालयीन स्टाफचे मनन | : सकाळी ९ वाजता - दररोज |
| २९. | कार्यालय | : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून) |

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**

Echo of His Call, Post Box 2957
CHEPAUK, CHENNAI - 600 005.
Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell : 98410 71852, 95661 31858
E.mail : biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | |
|---|---|
| **Account Name** | **: ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | **: 1023 2923 805** |
| **Bank Name** | **: STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | **: TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | **: SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | **: SBI NIN BB 455** |




# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**“नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !” (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**



## चेन्नाई दीप गृह

**CHENNAI LIGHT HOUSE!**

### तुमच्या जीवनातील अंधकार लवकरच प्रकाशात बदलेल!

अनेक वर्षांमागे, माझ्या सेवेत विविध पीडांचा परिणाला होता. त्या वेळेस, माझ्या मनात अनेक प्रश्न आले. मी विचार केला देवाच्या सेवेत येण्या ऐवजी मी इतर सर्वसामान्य लोकाप्रमाणे या जगात जगू शकलो असतो. मी जर तसे केले असते, तर मला त्रास देणाऱ्या सर्वांना माझ्या मार्गानें, आणि माझ्या शक्तिने जशास तसे उत्तर देवू शकलो असतो. आणि माझ्या आर्थिक समस्या सोडविण्याकरिता सोपा मार्ग शोधला असता. मी स्वत:शीच विचार केला, की देवाचा सेवक होण्याची माझी स्वत:ची इच्छा होती, कि माझ्या जीवनाकरिता खरोखरीच देवाचे बोलावणे होते.

मनात अशा विचारांनी घर केलेले असताना १९७६ साली रात्री १० वाजण्याच्या वेळेस 'मरीना बीच' वर चेन्नाई दीप गृहा जवळील ठिकाणी गुडघ्यावर येऊन प्रार्थना करु लागलो. त्या कठीण दिवशी मला आधार देणारे कोणीही नव्हते. सर्वांनी मला सोडले होते. माझे डोळे दीप गृहावर स्थिर झाले होते.

जहाजांना किनाऱ्यावर येण्याकरिता मार्गदर्शन करण्यास दिप गृहाच्या प्रकाश झोताची विशिष्ट गतीने फिरण्याची रचना करण्यात आलेली होती. गोलाकार फिरणाऱ्या प्रकाश झोताचे निरीक्षण करीत असताना, माझ्या निदर्शनास असे आले की प्रकाश अंदाजे १५ सेकंद प्रज्वलीत होत होता आणि १० सेकंद मंद होत होता.



या एका मागून एक बदल होण्याच्या नमुन्याचे सतत निरिक्षण करीत असताना मला एक नवीन दृष्टीकोण प्राप्त झाला आणि उत्तेजन मिळाले. त्याशिवाय देवाकडून मला “तुझ्या जीवनातील अंधकार लवकरच प्रकाशात बदलणार” असा एक स्पष्ट संदेश प्राप्त झाला.

प्रिय वाचका, तुला तू एका धोक्यात आहेस असे वाटत आहे कां? किंवा भयंकर पीडेला सामोरे जात आहेस कां? नाऊमेद होऊ नकोस! अंधकार आणि प्रकाश कदाचीत येणार आणि जाणार, परंतु प्रभु येशू ख्रिस्त सर्वदा सारखाच आहे. तो काल, आज आणि सर्वकाळ सारखाच आहे. आपले पूर्वज आब्राहाम, इसहाक आणि याकोब यांचा देव; तो तुझा हात धरुन तुझे रक्षण करील आणि वाचविल.

केवळ त्याजवर विश्वास ठेव!!

(पान ६ वरुन...)

जाणून त्याने अगोदरच विपुल अशी तरतूद करुन ठेविली अशासाठी कि त्यांना जलाशया जवळ तळ देता यावा.

बायबलमध्ये जर आपण पाहिले, तर आपल्याला असे दिसून येईल कि देवाच्या महान सेवकांना निराशेतून जावे लागले. अब्राहाम, नोहा, याकोब, शमुवेल, एली, हन्ना, यिर्मया, दाविद, ईयोब, नहेम्या, पेत्र, पौल, आणि अशा अनेक देवराज्यातील महान सेवकांनी निराशा आणि निपन्नावस्था अनुभवली अशा स्थितीत त्यांच्या विश्वासाची परिक्षा झाली आणि ते शुद्ध झाले आणि त्यांची वाढ झाली. आणि देवाचा गहन अनुभव आला. परंतु त्यांच्या निराशेच्या समयात देवाने त्याची योजना पूर्ण केली. या वर्षात तुमच्या जीवनात देखील तो करण्यास समर्थ आहे. देव त्याची आमच्या जीवना विषयीची योजना आमच्या निराशेच्या आणि विपन्नवस्थेत देखील पूर्ण करील. आज तुम्हाला निराश वाटत आहे कां? देव पडद्याच्या मागे कार्य करीत आहे. विसाव्याची खात्री आहे. आशा सोडून देवू नका. तुम्हाला त्याने त्याच्या तळहातावर कोरुन ठेविले आहे. आणि तुम्हाला तो विसरणार नाही. तुमच्या जीवनात जे त्याने सुरु केले, ते तो पूर्णत्वास नेईल.

### ३) नाऊमेदी/उत्साहभंग!

आपल्या जीवनातील देवाची वरदाने चोरुन घेण्यासाठी सैतान नाऊमेद/उत्साहभंग या तिसऱ्या शस्त्राचा उपयोग करितो.

या संबंधातील उदाहरण आपण मार्था आणि मरीया यांनी येशूला “**...प्रभुजी आपण एथे असतां तर माझा भाऊ मेला नसता....**” (योहान ११:३२). अशी तक्रार केली त्यात पहावयास मिळते. कांही



*मार्था आणि मरीया यांनी येशू ख्रिस्तला तक्रार केली*

वेळा देव आपल्याला जीवनात काही गमावल्याचा अनुभव येऊ देतो. आपल्या प्रिय जनांना गमावल्याचा आपणा पैकी काही जण मागील वर्षात या अनुभवातून गेले असणार आणि तो विश्वास ठेवण्यास कठीण असा नाऊमेद/उत्साहभंग असा असणार. आपण प्रश्न करितो, देवानें कां हस्तक्षेप केला नाही, आपल्या प्रार्थनांना कां उत्तर दिले नाही. तथापी बायबल योहान ११:३५ वचनात आठवण करुन देत आहे. "**येशू रडला.**" आपल्याला ज्याला आपले दु:ख वेदना, अश्रु आणि भग्नपणा समजतो असा महायाजक आहे. "**कारण ज्याला आपल्या अशक्तपणाचें दु:ख होत नाही, असा आपला प्रमुख याजक नाही, तर तो सर्व प्रकारें आपल्याप्रमाणे पारखलेला होता; तरी निष्पाप राहिला.**" (इब्री ४:१५)

तुम्ही रडता त्याच वेळेस येशू रडतो, आपल्यासारखेच दु:ख त्याला होते, तुमच्या परिक्षांत तो तुमच्या भोवती असतो कारण त्याला माहित आहे कि त्यामुळे विश्वास उत्पन्न होतो. त्यामुळे नाऊमेद होऊ नका. त्याने बेथानीस जाण्यास विलंब लावला, कारण त्याला आपला विश्वास वाढवावयाचा होता आणि तो आपल्या जीवनाचा उत्पन्नकर्ता आहे हे दाखवून द्यावयाचे होते. त्याने जाहिर केले, "... **पुनरुत्थान व जीवन मीच आहे...**" (योहान ११:२५).

बायबल याकोब १:२-३ या वचनात "**नाना प्रकारच्या संकटांनी तुमची परीक्षा होते तेव्हां केवळ .........तुम्हांस ठाऊक आहे कि तुमच्या विश्वासाची परिक्षा उतरल्यानें धीर उत्पन्न होतो.**" उत्तेजन देतो. "**तेव्हां आपण विश्वासात टिकून रहावे; माघार घेऊ नये. आपण माघार घेणाऱ्यापैकी नाही.**"

मागील वर्षात जे काही करण्याचे सोडून दिले होते, ते पुन: सुरु करण्यास देव तुम्हाला समर्थ करील. हे वर्ष पूर्नबांधणीचे असणार ज्यात सर्व काही पुर्ण झालेले. काही देखील करण्याचे राहून गेले नाही असे दिसून येईल.

देव तुमच्या परिक्षांत, पराभवात, लज्जेत आणि अपयशात तुमच्या सह चालत आहे. तो अग्नीत तुमच्या सह चालणारा चौथी व्यक्ति आहे, हे वर्ष तुम्हांला तुमच्या प्रयत्नांचे/श्रमाचे फळ पहावयास मिळणारे असेल.

तेव्हां, माझ्या प्रिय बंधुंनो आणि बहिणींनो, जेव्हा लागेल, दु:ख तुमची शांति आणि आनंद हिरावून घेईल आणि योजिल्यानुसार काही घडत नसेल, अशा वेळी त्यांत केवळ आनंदच माना. बायबल हेच आम्हाला शिकविते. या सर्वांतून आपण जात असताना आपला महायाजक आपल्या सोबत आहे. अग्नीत माझ्या आणि तुमच्या सोबत रहाणारी अशी दुसरी व्यक्ति तो आहे. देवाची वरदाने या स्थितीत आपल्या जीवनात शांति आणि आनंद आणतात.

तुम्ही एकटे नाही आणि त्या सर्वांला तुम्हाला एकटे सामोरे जाण्याची गरज नाही.

माघारे फिरु नका, प्रयत्नशील असा, आणि जेथून पडला तेथून पुन: उठा.

सैतानाच्या लबाडीकडे लक्ष देवू नका. देवाला ते ठाऊक आहे आणि ते तो घडू देतो.

# URGENT NEED

## VICE PRINCIPAL
for

**ST. PAUL'S MATRICULATION SCHOOL,**
**An *Echo of His Call* Institution**
**Vijayanagaram, Medavakkam, Chennai - 100.**

We need well qualified, experienced, dedicated, hard working and mission oriented Christian.
Apply with Bio-data to
E.mail: sam@echoofhiscall.org
WhatsApp: (+91) 98412 71858

# तातडीची गरज

आम्हाला **नहेम्या बायबल कॉलेज** करीता १००० हिन्दी ख्रिस्ती थियॉलॉजी पुस्तकांची गरज आहे. ती कोठून आणि कशी प्राप्त करता येतील याविषयी कळवावे.

**-पास्टर एस. सॅम सेल्वाराज,**संपादक
+९१-९८४१२७१८५६

# WANTED for

**NEHEMIAH BIBLE COLLEGE**
**of ECHO OF HIS CALL, Chennai**
**(ATA Candidate)**

1. **DEAN (Residential):**
   Hindi Theologian with M.Div. / M.Th. Degree & experience.
2. **VICE-PRINCIPAL:**
   English / Tamil / Hindi Theologian with M.Div. / M.Th. & experience.
3. **CO-ORDINATOR:**
   With Computer / Typing knowledge in English, Tamil & Hindi.

Eligible candidates may send bio--data to:
E.mail: sam@echoofhiscall.org
WhatsApp: (+91) 98410 71858

# ग्रंथालयाकरिता पुस्तकांची गरज

आम्हाला आमच्या **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल व नहेम्या बायबल कॉलेजच्या** ग्रंथालयाकरिता तामिल, इंग्रजी आणि हिन्दी भाषिक पुस्तकांची गरज आहे. तुमच्याकडे नवी किंवा जुनी (चांगल्या अवस्थेत) पुस्तके असतील आणि ती तुम्ही देणगी म्हणून देवू इच्छित असाल तर कृपया आमच्याशी संपर्क साधा.

- Pr. S. Sam Selva Raj, Editor
+91-98412 71858

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## एको ऑफ हिज कोल

**यु ट्युब सबस्क्राईब करा**

जेव्हा तुम्हाला वेळ मिळेल तेव्हा कृपा करुन आमच्या **एको ऑफ हिज कॉल यु ट्युब चॅनल** बघा व सबस्क्राईब करा. धन्यवाद

**- संपादक**

## OUR BANK DETAILS:

### *1. Bank : State Bank of India*

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

### *2. Bank : ICICI Bank*

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

### *3. Bank : State Bank of India*

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/- आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th JANUARY 2024**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
P.O. Box No. 2957,
Chepauk, Chennai - 600 005, INDIA.
Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**